सकाळ
कोल्हापूर, रविवार, १७ मार्च, २०२४

# सैन्यदलात जाऊन करिअर घडवा

## कर्नल आकाश मिश्रा; व्हाईट आर्मी, विवेकानंद कॉलेजतर्फे व्याख्यान

कोल्हापूर, ता. १६ : सैन्यभरती प्रक्रिया खूप पारदर्शक असते. त्याबाबत आमिषाला बळी पडू नका. सैन्यदलात भरती होऊन करिअर घडवा, असे आवाहन आर्मी रिक्रुटमेंट कमांडिंग ऑफिसर कर्नल आकाश मिश्रा यांनी विद्यार्थ्यांना येथे केले.

येथील व्हाईट आर्मी आणि विवेकानंद कॉलेजतर्फे आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अग्निवीर एसएसबी आणि एनडीए ऑफिसरबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. एआरओचे सुभेदार मेजर बलिहार सिंग यांच्यासह जवानांनी माहिती दिली. अध्यक्षस्थानी कॉलेजचे मराठी विभागप्रमुख डॉ. एकनाथ आळवेकर होते.




**कोल्हापूर :** व्हाईट आर्मी आणि विवेकानंद कॉलेजतर्फे आयोजित व्याख्यानात मंगळवारी आर्मी रिक्रुटमेंट कमांडिंग ऑफिसर कर्नल आकाश मिश्रा यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शेजारी अशोक रोकडे, एकनाथ आळवेकर, संदीप पाटील उपस्थित होते.

कर्नल आकाश मिश्रा म्हणाले, 'सैन्यभरतीत अग्निवीरपासून अधिकारी बनण्यासाठी महिलांना वेगवेगळे मार्ग देशाने निर्माण केले आहेत. ही संधी सोपी आहे. त्यात टेक्निकल ते मेडिकलपर्यंत सर्व सुविधा महिलांना उपलब्ध आहेत. सैन्यात सहभागी होऊन पुढील शिक्षणही घेऊ शकता. त्यासाठी सवलतही आहे. खेळाडू असाल तर सैन्यात विशेष खेळाडू म्हणून करिअर करता येते. टेक्निकल मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिक डिप्लोमा 'आणि आयटीआय असणाऱ्यांनाही सैन्यात चांगली संधी आहे.

कार्यक्रमात व्हाईट आर्मीचे संस्थापक अध्यक्ष अशोक रोकडे यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी देशात होणाऱ्या सैन्य भरतीचे प्रत्येक महिन्याचे माहिती संकलन आणि प्रसिद्धी केंद्र सुरू करण्याचे काम व्हाईट आर्मीतर्फे सुरू आहे. सैन्य भरतीत येणाऱ्या अडचणीबाबत मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात येईल. कोल्हापुरातील तरुणांना देश सेवेसाठी अधिकारी बनण्यासाठी लागणाऱ्या सुविधा पुरविण्याची व्यवस्था येथे होणार असल्याचे त्यांनी सांगितले. एनसीसी लेफ्टनंट प्रा. जे. आर. भरमगोंडा यांनी सूत्रसंचालन केले. 'एनएसएस'चे कार्यक्रम अधिकारी प्रा. संदीप पाटील यांनी आभार मानले. प्रा. सुनीता भोसले, प्रशांत शेंडे आदींनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

सकाळ
कोल्हापूर, रविवार, १७ मार्च, २०२४

18/03/24

18/3/24



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये मानसिक आरोग्य चर्चासत्र झाले.

# विवेकानंद कॉलेजमध्ये मानसिक आरोग्यावर चर्चासत्र

कोल्हापूर, ता. १६ : रोटरी मेंटल हेल्थ उपक्रम व रोटरॅक्ट मुव्हमेंट कोल्हापूर झोनतर्फे विवेकानंद कॉलेज मध्ये मानसिक आरोग्य सेवा चर्चासत्र व रक्तदान शिबिर झाले. तणावग्रस्त विद्यार्थ्यांमध्ये त्यांच्या परीक्षा व व्यावसायिकांसाठी सकारात्मक विचारांचा प्रसार करणे या हेतूने या शोबिराचेआयोजन केले होते.

यावेळी सोनल जोशी यांनी मार्गदर्शन केले. या नंतर रक्तदान शिबीर घेण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन रोटरॅक्ट क्लब ऑफ विवेकानंद कॉलेज, रोटरॅक्ट क्लब ऑफ कोल्हापूर, रोटरॅक्ट क्लब ऑफ स्वराज्य, रोटरॅक्ट क्लब कोल्हापूर मिडटाउन फिनिक्स, रोटरॅक्ट क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल, रोटरॅक्ट क्लब ऑफ समर्पण यांनी एकत्रित केले. यावेळी कोल्हापूर झोन प्रमुख अभिजित पाटील, अध्यक्ष रोहित पाटील, श्रेयस पाटील, सूरज पाटील, वैष्णवी राजपूत, ऋग्वेद बिदनूर, अखिलेश जाधव, शंभूराज भोसले, शुभम वाडकर, सौरभ पाटील, अनिश भोसले उपस्थित होते.